नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - २६ | Issue - 26 | वार गुरुवार दि. १२ जून २०२५ | Blow- Thursday Date 12 June 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना कंत्राटी पद्धतीने पुन्हा सेवेत घेणार

## राज्य सरकारने घेतला महत्त्वाचा निर्णय



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मंत्रालयासह अनेक शासकीय ठिकाणी कंत्राटी भरतीला प्राधान्य देणाऱ्या राज्य सरकारने आणखी एक मोठा निर्णय घेतला आहे. आता सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनाही कंत्राटी पद्धतीने पुन्हा सेवेत घेता येणार आहे. वयाच्या ६५ व्या वर्षांपर्यंत या अधिकाऱ्यांना कंत्राटी पद्धतीने काम करता येणार आहे. राज्य शासनाच्या या निर्णयाला कर्मचारी आणि अधिकारी संघटनांनी मात्र विरोध केला आहे. अशा अधिकाऱ्यांची निवड करताना मर्जीतल्या अधिकाऱ्यांनाच संधी दिली जाईल, भेदभाव होण्याची शक्यता असल्याचा आरोप संघटनांनी केला आहे.

राज्यातील बहुतांश खात्यातील जागा कायमस्वरुपी न भरता त्या कंत्राटी पद्धतीने भरण्याला राज्य सरकारने प्राधान्य दिलं आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी नव्याने भरतीच झाली नसल्याचं दिसून येतंय. त्यातच आता राज्य सरकारने आणखी निर्णय घेतला आहे. शासकीय सेवेतून निवृत्त झालेल्या सरकारी अधिकाऱ्यांना पुन्हा कंत्राटी पद्धतीने सेवेत घ्यायचा मार्ग म ोकळा झाला आहे.

वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंत अशा अधिकाऱ्यांना कंत्राटी भरतीच्या माध्यमातून सेवेत घेण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. यामध्ये सर्व शासकीय आणि निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना करार पद्धतीने सेवेत घेता येणार आहे. सध्या राज्यात शासकीय निवृत्तीचे वय ५८ वर्षे आहे. त्यामुळे करार पद्धतीने अशा अधिकाऱ्यांना आणखी सात वर्षे सेवेत राहता येणार आहे. मात्र राज्य सरकारच्या या निर्णयाला कर्मचारी, अधिकारी संघटनांचा विरोध आहे. जर राज्य सरकार ६५ वर्षापर्यंत करार पद्धती-ने कामावरती घेत असेल तर निवृत्तीचं वय ६० वर्षे का करत नाही असा प्रश्न त्यांनी विच-ारला आहे. कंत्राटी पद्धतीने निवृत्त अधिकाऱ्यांना सेवेत घेताना भेदभाव करून त्यांची निवड केली जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे करार पद्धतीने घेण्याऐवजी निवृत्तीचे वय ६० वर्षे करावे अशी मागणी कर्मचारी आणि अधिकारी संघटनांनी केली आहे. राज्यात सध्या शासकीय कर्मचाऱ्याच्या निवृत्तीचे वय ५८ वर्षे इतके आहे. ते वाढवून ६० वर्षे करण्यात यावे अशी मागणी सातत्याने केली जात आहे. या आधी निवृत्तीचे वय हे ६० वर्षे च होतं. पण नंतर ते कमी करून ५८ इतके करण्यात आलं. आता निवृत्तीचे वय पुन्हा ६० वर्षे करावे अशी मागणी कर्मचारी आणि अधिकारी संघटनांनी केली आहे.

# तुळजाभवानीच्या मंदिरात थुंकणं भोवलं, आठ पुजाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**





धाराशिव : श्री तुळजाभवानी मंदिर परिसरात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करून थुंकणाऱ्या आठ पुजाऱ्यांवर मंदिर संस्थानाने कडक कारवाईची भूमिका घेतली आहे. मंदिराच्या शिस्तीला बाधा निर्माण करणाऱ्या अशोभनीय वर्तनामुळे संबंधित पुजाऱ्यांना 'कारणे दाखवा' नोटीस बजावण्यात आली असून, तीन महिन्यांसाठी मंदिरप्रवेश बंदीची कारवाई होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

संबंधित पुजाऱ्यांनी मंदिर परिसरात तंबाखूजन्य पदार्थ खाऊन थुंकल्याचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये स्पष्टपणे आढळून आले आहे. यामुळे मंदिर प्रशासनाने तातडीने दखल घेत, देऊळ कवायत कलम २४ व २५ अन्वये संबंधितांवर नोटीस बजावली आहे. तीन दिवसात समाधानकारक खुलासा न झाल्यास या पुजाऱ्यांना तीन महिने मंदिरात प्रवेशबंदी होणार असल्याचे सांगितले जात आहे.

मंदिरातील पुजाऱ्यांचे वर्तन अशोभनीय

मंदिर प्रशासनाने नोटीसमध्ये स्पष्ट केले आहे की, पुजारी व्यवसायास अशा प्रकारचे वर्तन शोभणारे नसून, मंदिर परिसरातील पावित्र्याला बाधा पोहोचवणारे आहे. यामुळे मंदिराचे कायदा व सुव्यवस्थेचे उल्लंघन होत असून, शिस्तीचा भंग होत आहे. नोटीस मि ळाल्यानंतर तीन दिवसांच्या आत स्पष्टीकरण सादर करण्याचे आदेश देण्यात आले आ-हेत. अन्यथा, मिळालेला खुल-ासा असमाधानकारक असल्यास तीन महिन्यांची मंदिरप्रवेश बंदी घालण्यात येईल, असेही नोटीसम ध्ये नमूद करण्यात आले आहे.

तुळजापूर येथील ड्रग्ज तस्करीची मोठी चर्चा आहे . १५ फेब्रुवारी २०२५ ला तुळजा-पूर तालुक्यात २.५ लाख रुपये किमतीचे एमडी ड्रग जप्त करण्यात आले होते. ड्रग्ज प्रकरणात काही दिवसांपूर्वी राजकीय कनेक्शनही समोर आले होते. या प्रकरणात तुळजाभवानी मंदिरातील तब्बल १३ पूजाऱ्यांचा ड्रग्ज तस्करीशी संबंध झाल्याचे उघड झाल्याने मोठी खळबळ उडाली होती.

मंदिर प्रशासनाने या आरोपी पुजाऱ्यांची यादी पोलिसांकडून मागवली आहे. पुजारी मंडळाने मात्र सरसकट पुजाऱ्यांची बदनामी थांबवण्याचे आवाहन केले होते. कारण आरोपी पुजारी देवीच्या दैनंदिन पूजेत सहभागी नव्हते. याप्रकरणातील पुढील कारवाईकडे सर्वांच्या नजरा लागल्या होत्या.

तीन मोठ्या बदलांची रेल्वे मंत्र्यांकडून घोषणा

# रेल्वेच्या तात्काळ तिकीट बुकिंगचे नियम बदलले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी जाहीर केल्याप्रमाणे तात्काळ तिकिट बुकिंगच्या नियमात बदल करण्यात आले आहेत. या बदलांची अंमलबजावणी १ जुलैपासून करण्यात येणार आहे. नव्या नियमांनुसार १ जुलैपासून आयआरसीटीसी खातं आधार प्रमाणीकरण असेल त्यांनाच तात्काळ तिकिट काढता येणार आहे. तर, १५ जुलैपासून आधार ओटीपी द्वारे पडताळणी प्रक्रिया झाल्यानंतर तात्काळ तिकीट बुकींग करता येईल.

तात्कळ तिकिट बुकिंग करताना येणाऱ्या अडचणींबाबत प्रवाशांकडून सातत्यानं आव-ाज उठवला जात होता. अखेर केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी नवे बदल जाहीर केले आ-हेत. रेल्वेच्या तात्काळ तिकिटांची निष्पक्ष आणि पारदर्शक उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी आणि प्रामाणिक प्रवाशांचे हित जपण्यासाठी भारतीय रेल्वेने तात्काळ तिकिट आरक्षण प्रणालीमध्ये म हत्त्वपूर्ण सुधारणा केल्या असल्याचं जाहीर केलं. या सुधारणा यूजर्सचे प्रमाणीकरण अधिक काटेकोर करणे आणि तात्काळ तिकिटांचा गैरवापर कमी करण्याच्या उद्देशाने केल्या आहेत.

नवे बदल पुढील प्रमाणे

१. ऑनलाईन तात्काळ आरक्षणासाठी आधार प्रमाणीकरण

दिनांक १ जुलैपासून आयआरसीटीसीचे अधिकृत संकेतस्थळ आणि मोबाईल अॅपद्वारे तात्काळ तिकिटांचे आरक्षण फक्त आध-ारने प्रमाणित केलेल्या वापरकर्त्यांसाठी उप-लब्ध असेल.याचसोबत १५ जुलै २०२५ पा-सून ऑनलाइन तात्काळ तिकीट आरक्षणासाठी आधार-आधारित ओटीपी प्रमाणीकरण अनिवार्य असेल.

२. पीआरएस काउंटरवर आणि मध्यस्थांच्या माध्यमातून तात्काळ तिकीट आरक्षणासाठी प्रणा-ली आधारित ओटीपी प्रमाणीकरण:

संगणकीकृत प्रवासी आरक्षण प्रणाली (पीअ-ारएस) काउंटरवर आणि अधिकृत मध्यस्थांद्वारे (एजंट्स) आरक्षित तात्काळ तिकिटांसाठी आर-क्षण करताना वापरकर्त्याने दिलेल्या मोबाइल क्रम ांकावर ओटीपी प्रमाणीकरण पाठवणे आवश्यक असेल.ही तरतूद देखील १५ जुलै २०२५ पासून लागू होईल.

३. अधिकृत एजंटांसाठी आरक्षण वेळेचे निर्बंध:

तात्काळ तिकिट बुकिंगच्या सुरुवातीच्या म हत्त्वपूर्ण वेळेत होणाऱ्या बल्क बुकिंगला आळा घालण्यासाठी भारतीय रेल्वेच्या अधिकृत तिकिट एजंटाना प्रारंभिक दिवस तात्काळ तिकिटे, बुकिंग विंडोच्या पहिल्या ३० मिनिटांच्या कालावधीत आरक्षित करता येणार नाहीत. वातानुकूलित श्रेणीतील तिकीट बुकिंगसाठी, हे निर्बंध सकाळी १०:०० ते १०:३० पर्यंत आणि बिगर वातानुकूलित श्रेणीसाठी, सकाळी ११:०० ते ११:३० या वेळेत लागू राहतील.

तात्काळ आरक्षणामध्ये पारदर्शकता सुधारण्यासाठी आणि योजनेचे फायदे खऱ्या अंतिम वापरकर्त्यांपर्यंत पोहोचण्याची सुनिश्चिती करण्यासाठी हे बदल करण्यात येत आहेत.

सीआरआयएस आणि आयआरसीटीसीला प्रणालीत आवश्यक सुधारणा करण्याचे आणि सर्व विभागीय रेल्वे आणि संबंधित विभागांना त्यानुसार माहिती देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

रेल्वे मंत्रालय सर्व प्रवाशांना या बदलांची नोंद घेण्याचे आवाहन केलं आहे. गैरसोय टाळण्यासाठी प्रत्येक व्यक्तीने आपल्या आयआरसीटीसी यूजर प्रोफाइलशी आधार जोडणी पूर्ण केल्याची खात्री करुन घ्यावी, असं आवाहन करण्यात आलं आहे.

बच्चू कडू यांचे अन्नत्याग आंदोलन | हर्षवर्धन पाटील यांची दूरध्वनीवरून चर्चा

# बच्चू कडू यांच्या शेतकरी कर्जमाफी व इतर मागण्यांना पाटील यांचा पाठिंबा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



इंदापूर/प्रतिनिधी : प्रहार जनशक्ती पक्षाचे सर्वेसर्वा आणि अध्यक्ष, माजी मंत्री बच्चू कडू यांनी शेतकऱ्यांच्या संपूर्ण कर्जमाफीसह दिव्यांग विधवा महिलांच्या प्रश्नांसंदर्भात तसेच सर्वसाम ान्य नागरिक, महिला, शेतमजूर, युवक यांच्या हितासाठी केलेल्या विविध मागण्यांना राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी पाठिंबा व्यक्त केला आहे. या संदर्भात बच्चू कडू यांच्याशी हर्षवर्धन पाटील यांनी बुधवारी (दि. ११) सायंकाळी दूरध्वनीवरून चर्चा केली व पाठिंबा व्यक्त करीत त्यांच्या प्रकृतीची विचारपूसही केली.

बच्चू कडू यांनी मोझरी-अमरावती येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज समाधीस्थळाज-वळ विविध मागण्यासाठी बेमुदत अन्न त्याग आंदोलन सुरु केले आहे. या आंदोलनाचा बुधवार हा ४ था दिवस आहे.

बच्चू कडू यांचेची दूरध्वनीवरून चर्चा करून हर्षवर्धन पाटील यांनी बच्चू कडू यांच्या विविध मागण्यांवरती राज्य सरकारने गांभीर्याने विचार करून त्या तात्काळ मान्य कराव्यात, अशी मागणी केली आहे. शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करू, असे सत्ताधारी पक्षांने निवडणुकीच्या संकल्पपत्रात जाहीर केलेले आहे. शेतकऱ्यांचा सात-बारा कोरा केला जाणार होता. परंतु निवडणुका संपल्यानंतर सत्ता स्थापन होऊन अनेक महिने होऊनही सरकारकडून या आश्वासनांची पूर्तता केली जात नाही.

सध्या शेतकरी अडचणीत असून उत्पादन खर्च वाढला असून शेतीमाल-ाला चांगला भाव मिळत नाही, त्यामुळे शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी करावी, ही बच्चू कडू यांची रास्त मागणी असल्याचे हर्षवर्धन पाटील यांनी सांगितले. तसेच बच्चू कडू यांनी समाजातील इतर घटकांच्या हितासाठी केलेल्या विविध मागण्याही राज्य सरकारने मान्य कराव्यात, अशी मागणीही हर्षवर्धन पाटील यांनी केली आहे.



## संपादकीय....

### पुजाऱ्यांचा प्रताप

तुळजापूर येथील ड्रग्ज तस्करीची मोठी चर्चा आहे . १५ फेब्रुवारी २०२५ ला तुळजापूर तालुक्यात २.५ लाख रुपये किमतीचे एमडी ड्रग जप्त करण्यात आले होते. ड्रग्ज प्रकरणात काही दिवसांपूर्वी राजकीय कनेक्शनही समोर आले होते. या प्रकरणात तुळजाभवानी मंदिरातील तब्बल १३ पूजाऱ्यांचा ड्रग्ज तस्करीशी संबंध झाल्याचे उघड झाल्याने मोठी खळबळ उडाली होती. मंदिर प्रशासनाने या आरोपी पुजाऱ्यांची यादी पोलिसांकडून मागवली आहे. पुजारी मंडळाने मात्र सरसकट पुजाऱ्यांची बदनामी थांबवण्याचे आवाहन केले होते. कारण आरोपी पुजारी देवीच्या दैनंदिन पूजेत सहभागी नव्हते. याप्रकरणातील पुढील कारवाईकडे सर्वांच्या नजरा लागल्या होत्या. दरम्यान हे प्रकरण ताजे असतानाच श्री तुळजाभवानी मंदिर परिसरात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करून थुंकणाऱ्या आठ पुजाऱ्यांवर मंदिर संस्थानाने कडक कारवाईची भूमिका घेतली आहे. मंदिराच्या शिस्तीला बाधा निर्माण करणाऱ्या अशोभनीय वर्तनामुळे संबंधित पुजाऱ्यांना 'कारणे दाखवा' नोटीस बजावण्यात आली असून, तीन महिन्यांसाठी मंदिरप्रवेश बंदीची कारवाई होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. संबंधित पुजाऱ्यांनी मंदिर परिसरात तंबाखूजन्य पदार्थ खाऊन थुंकल्याचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये स्पष्टपणे आढळून आले आहे. यामुळे मंदिर प्रशासनाने तातडीने दखल घेत, देऊळ कवायत कलम २४ व २५ अन्वये संबंधितांवर नोटीस बजावली आहे. तीन दिवसात समाधानकारक खुलासा न झाल्यास या पुजाऱ्यांना तीन महिने मंदिरात प्रवेशबंदी होणार असल्याचे सांगितले जात आहे. मंदिर प्रशासनाने नोटीसमध्ये स्पष्ट केले आहे की, पुजारी व्यवसायास अशा प्रकारचे वर्तन शोभणारे नसून, मंदिर परिसरातील पावित्र्याला बाधा पोहोचवणारे आहे. यामुळे मंदिराचे कायदा व सुव्यवस्थेचे उल्लंघन होत असून, शिस्तीचा भंग होत आहे. नोटीस मिळाल्यानंतर तीन दिवसांच्या आत स्पष्टीकरण सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. अन्यथा, मिळालेला खुलासा असमाधानकारक असल्यास तीन महिन्यांची मंदिरप्रवेश बंदी घालण्यात येईल, असेही नोटीसमध्ये नमूद केले आहे.

# शेतीप्रधान महाराष्ट्रात तांदळाचे नवीन वाण शोधणाऱ्या शेतकऱ्याच्या नावावर एकही पेटंट नाही



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
सोलापूर/महेश गायकवाड

भारत हा शेतीप्रधान देश असूनही आज शेती आणि शेतकरी दोघेही करुणेचा विषय झाले आहेत. शेतीत नवनवे प्रयोग तर दूरच पण, आहे ती शेती कसणेही मुश्कील झाले आहे. ज्यांना शेतीविषयी खरंच नितांत आदर आणि तळमळ आहे असे थोडेफार शेतकरी शेतात काही नवे प्रयोग करत शेती आणि शेतकरी दोघांनाही यातून तारण्यासाठीचे उपाय शोधत आहेत. शेतकऱ्याला एकीकडे अन्नदाता म्हटले जाते आणि दुसरीकडे त्याची उपेक्षाही केली जाते. हा विरोधाभास हीच आजची वस्तुस्थिती आहे.

महाराष्ट्रातील चंद्रपूर जिल्ह्यातील नागभीड तालुक्यातील नांदेड गावाचे दादाजी खोब्रागडे यांना कृषिभूषण, कृषी संशोधक म्हणून ओळखले जाते. दादाजी कष्टाळू आणि संशोधक वृत्तीचे शेतकरी होते, यांनी प्रचंड मेहनतीने तांदळाच्या नऊ नव्या वाणांचा शोध लावला. ज्यांच्यासाठी शेती हीच त्यांची कर्मभूमी होतीपण, दुर्दैव की या कष्टाळू शेतकऱ्याला त्याच्या या संशोधनाचा योग्य मोबदला मिळाला नाही.

केवळ तिसरीपर्यंत शिक्षण झालेले दादाजी खोब्रागडे यांनी आपल्या संशोधनाने महाराष्ट्रातील आणि महाराष्ट्राच्या आसपासच्या राज्यातील लाखो शेतकऱ्यांसाठी समृद्धीचे द्वार उघडले होते.

आज दहा लाखाहून अधिक हेक्टर क्षेत्रात एचएमटी तांदळाचे पिक घेतले जाते. या एचएमटी वाणाचा शोध खोब्रागडे यांनीच लावला. १९९०च्या आसपास त्यांनी एचएमटी ही तांदळाची नवी जात बाजारात आणली.

तांदळाचे हे नवे वाण तयार झाले तेंव्हा त्यांच्या हातात त्याकाळचे प्रसिद्ध एचएमटी घड्याळ होते म्हणून त्यांनी भाताच्या या नव्या वाणाला एचएमटी हेच नाव दिले.

शेतकऱ्यांनी या नव्या वाणाला प्रचंड प्रतिसाद दिला. इतका की पुढच्याच वर्षी याचे भाव वाढवून दुप्पट करण्यात आले. अनेक प्रदेशातील हवामानाशी मिळते जुळते असल्याने अल्पावधीतच याचा खप वाढला. एचएमटीचे वाण कसे विकसित झाले याची कथा मोठी रंजक आहे. पडीक जमिनीतून उगवणार सोनं; महाराष्ट्र शासनाची फळझाड/वृक्ष लागवड योजना एक्सप्लेनर - मायक्रोसॉफ्टच्या पीसीवर सकाळपासून येणाऱ्या 'ब्लू स्क्रीन ऑफ डेथ'मागील कारण एकेकाळी सायन्स फिक्शन वाटणारी फ्लायिंग कार आता प्रत्यक्षात उतरणार आहे, पण १९८० साली शेतातील भाताचे पिक वाढले तेंव्हा दादाजींच्या असे लक्षात आले की यातील एका रोपाला असलेले भाताचे दाणे टपोरे आणि पूर्ण भरलेले असून इतर सर्व रोपांपेक्षा हे रोप काहीसे वेगळे आहे. त्यांनी या एकाच भाताच्या रोपाचे भात बियाणे जपून ठेवले आणि पुढच्या वर्षी त्या भातांच्या बियाण्यांची पेरणी केली.

पुन्हा हे बियाणे जपून ठेवत त्याच्या पुढच्या वर्षी त्या बियाणांची पेरणी केली. अशा प्रकारे मोठ्या प्रमाणात एचएमटीचे पूर्ण वाण विकसित होण्यास काही वर्षांचा कालावधी लागला. १९९०पर्यंत या नव्या वाणाची माहिती आसपासच्या शेतकऱ्यांपर्यंत पोहचली. त्यांनीही एचएमटीची मागणी सुरु केली.

१९९४मध्ये पंजाबराव कृषी विद्यापीठा (पीव्हीके) अंतर्गत येणाऱ्या जवळच्याच सिंदेवाडी राईस स्टेशनमधून काही अधिकारी आले आणि त्यांनी प्रयोगासाठी या नव्या एचएमटी बियाणांची मागणी केली. दादाजींनी त्यांना पाच किलो बियाणे दिले ज्याची त्यांनी फक्त एक रिसीट दिली.

१९९८ साली पीकेव्हीने पीकेव्ही-एचएमटी नावाने नव्या जातीचा शोध लावल्याचा दावा केला. त्याच्या मते हे वाण पूर्वीच्या वाणापेक्षा अधिक शुद्ध होते. परंतु त्यांनी एकदाही याचे मूळ बियाणे आपण कुठून मिळवले याचा जाहीररीत्या उच्चार केला नाही की दादाजींना त्यांचे श्रेय दिले नाही.

२००४मध्ये द हिंदू वृत्तपत्राने दादाजींच्या नवनव्या संशोधनाची दखल घेतली आणि त्यांनी खोब्रागडेंच्या संशोधनावर प्रकाश टाकला. हळूहळू दादाजींचा संशोधनाची दाखल घेत त्यांना अनेक पुरस्कार आणि मानसन्मान देण्यात आले. पण, त्यांना त्यांच्या एकाही वाणाचे पेटंट मिळाले नाही.

हजारो शेतकऱ्यांना बियाणे पुरवणाऱ्या त्यांच्यासाठी समृद्धी आणणाऱ्या दादाजींचे शेवटचे दिवस तर अत्यंत हलाखीत गेले. त्यांच्या संशोधनाची दाखल फोर्ब्जसारख्या आंतरराष्ट्रीय मासिकाने देखील घेतली. तेंव्हा कुठे महाराष्ट्र सरकारने त्यांच्या कामाची दखल घेत अनेक व्यासपीठांवर त्यांना आमंत्रित केले आणि त्यांना विविध पुरस्कार प्रदान करण्यात आले.

नॅशनल इनोव्हेशन फाउंडेशनने (एनआयएफ) देखील एचएमटी वाणाचा शोध लावल्याबद्दल त्यांचा सन्मान केला. एनआयएफने त्यांच्याकडून एचएमटी, डीआरके आणि इतर सात त्यांनी शोधलेल्या वाणांचे बियाणे घेतले. प्रोटेक्शन ऑफ प्लांट अँड फार्मर्स राईट ऑथोरिटी (पीपीव्हीएफआरए) यांच्यासह पीपीव्हीएफआर कायदा २००१नुसार त्यांनी या बियाण्यांचा अधिकार देखील आपल्याकडे घेतला.

एनआयएफने एचएमटीचे रजिस्ट्रेशन करण्यासाठी पीपीव्हीएफआरएकडे अर्ज दाखल केला. त्यांच्या अर्जाची चार वर्षाने दाखल घेण्यात आली. ४ एप्रिल २०१२ रोजी त्यांना याचे प्रमाणपत्र देण्यात आले. या प्रमाणपत्रानुसार त्यांना या बियाण्यांचे उत्पादन, विक्री, मार्केट, वितरण, आयात आणि निर्यात करण्याचे अधिकार देण्यात आले होते. अर्थात, या वाणाची नोंद दादाजी एचएमटी या नावाने करण्यात आली. त्यामुळे पीकेव्हीने आणलेल्या वाणाची नोंद पीकेव्ही-एचएमटी अशा नावाने करणे सोपे झाले. परंतु लोकप्रिय एचएमटी नाव मात्र मागेच राहिले.

एनआयएफने दादाजींच्या एचएमटीसह सर्व वाणाचे अधिकार आपल्याकडे घेतले.

इलेक्ट्रॉनिक स्टॅम्प पेपर डॉक्युमेंटवर त्यांनी आपले अधिकार हस्तांतरित करीत असल्याबद्दल दादाजींची सही घेतली आणि त्याच्या प्रत्येक वाणाचे फक्त ५०,०००/- रु. या दराने दोन वाणांचे त्यांना फक्त १,००,००० रु रक्कम देण्यात आली. एनआयएफने दिलेली ही रक्कम अगदीच तोकडी होती. एचएमटीचे वाण तर आधीच प्रचंड लोकप्रिय झाले होते. त्यामुळे त्याची विक्री मोठ्या प्रमाणात होणार याची खोब्रागडेंना खात्री होती.

एनआयएफने त्यांना पुढील संशोधनासाठी १२.५% दराने ३ लाख रुपयांचे व्याज दिले. यातील एक लाख रुपयांचे कर्ज खोब्रागडे यांनी परत केले. पण, पुढच्याच वर्षी त्यांना सेरेब्रलचा स्ट्रोक आल्याने तब्येत प्रचंड खालावली. दादाजींचा मुलगा मित्राजित याने एनआयएफला किमान व्याजाची रक्कम तरी माफ करावी अशी विनंती केली. पण, एनआयएफने कर्ज माफ करण्यासाठी याचे एचएमटी आणि डीआरके या वाणांचे हक्क खाजगी कंपनीला हस्तांतरित करावे लागतील आणि त्यासाठी थोडा विलंब होईल असे कारण दिले.

फक्त एचएमटी आणि डीआरकेच नाही तर खोब्रागडेंनी २००५पर्यंत नांदेड ९२, नांदेड चीनुर, विजय नांदेड, दीपक रत्न, नांदेड हिरा, काटे एचएमटी आणि डीआरके-२ असे आणखी सात वाणांचे बियाणे शोधले होते. या सर्वांचे हक्क एनआयएफने खोब्रागडेंच्या वतीने स्वतःच्या नावाने रजिस्टर केल्याचे पीपीव्हीएफआरएने कळवले.

एका प्रामाणिक कष्टाळू शेतकऱ्याने प्रचंड मेहनतीने शोधलेले या वाणाचे अधिकार त्याला न मिळता कुठल्यातरी खाजगी कंपनीला मिळाले. हतबल होऊन याकडे पाहण्याशिवाय खोब्रागडे काही करू शकले नाहीत. संशोधक शेतकऱ्याची जर अशी शोकांतिका होत असेल तर, याहून मोठे दुर्दैव ते कोणते.

दादाजींचे हे काम एखाद्या विद्यापीठात संशोधक म्हणून गलेलठ्ठ पगाराची नोकरी करणाऱ्या देखील लाजवणारे आहे. माजी राष्ट्रपती आणि वैज्ञानिक अब्दुल कलम यांच्या हस्ते त्यांना गौरवण्यात आले.

अखेरच्या क्षणी अशा भूमिपुत्राच्या वाट्याला अवहेलनेशिवाय काहीच आले नाही! हे दुर्दैव च म्हणावे लागेल.

## भिमप्रकाश मागासवर्गीय बहुउद्देशिय संस्था अक्कलकोट च्या वतीने आमरण उपोषणास पाठिंबा




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
अक्कलकोट/प्रतिनीधी

अक्कलकोट शहर व तालुक्यातील अनेक नागरिक आठवडा बाजार करिता दवाखान्याला जाण्यासाठी व दैनंदिन व्यवहारा करीता कांदा बाजार येथून रोज हजारो नागरिक बस स्थानकातून ये जा करत असतात त्यांना येण्या जाण्या साठी बस स्थानकामधून रस्ता जवळ चा व सोयीस्कर पडतो तोच रस्ता एस टी महामंडळ ने बंद करून लोकांची गैर सोय केली आहे त्याच्या विरोधात आमरण उपोषण सुरु आहे नागरिकांच्या सोयीसाठीअक्कलकोट बस स्थानकातून दक्षिण बाजूला आठवडा बाजार कांदा बाजार कडे पायवाट सोडण्यात यावा या करिता समाजसेवक बुडन तांबोळी यांच्या आमरण उपोषणाला भेट देऊन भिमप्रकाश मागासवर्गीय बहुउद्देशिय संस्था अक्कलकोट च्या वतीने पाठींबा दिला यावेळी संस्थापक अध्यक्ष शिलामणी दादा बनसोडे युवानेते योगेश दादा पवार रवि आदी उपस्थित होते

# अक्कलकोट येथे पायवाटेच्या मागणीसाठी उपोषणाला इस्माईल आळंद यांचा पाठिंबा




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
अक्कलकोट/तालुका प्रतिनिधी : अक्कलकोट येथे सध्या नवीन बस स्थानकाचे काम चालु असून दक्षिण भागात राहणाऱ्या नागरिकांसाठी पायवाट सोडण्याच्या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ता बुडन तांबोळी यांनी सुरू केली आहे,आमरण उपोषणाला मैंदर्गी येथील सामाजिक कार्यकर्ते इस्माईल उस्मान आळंद यांनी आपला जाहीर पाठिंबा व्यक्त केला आहे.

तांबोळी यांनी १ जूनपासून अक्कलकोट येथील बस डेपोसमोर हे उपोषण सुरू केले आहे.इस्माईल आळंद यांनी बुडन तांबोळी यांना दिलेल्या समर्थन पत्रात म्हटले आहे की, अक्कलकोट बस स्थानकातून दक्षिणेकडे पायवाट सोडण्याच्या आपल्या न्यायपूर्ण मागणीसाठी आपण अक्कलकोट येथील बस डेपोसमोर सुरू केलेल्या आमरण उपोषणाला मैंदर्गी येथील एक सामाजिक कार्यकर्ता म्हणून मी,आपल्याला जाहीर पाठिंबा करतो.

आळंद यांनी तांबोळींच्या या प्रयत्नांचे कौतुक केले असून, यामुळे अक्कलकोट शहरातील नागरिकांना ये जा करण्यास जवळ पडेल अशी आशा व्यक्त केली आहे. आपण नागरिकांच्या सोयीसाठी हे महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे, हे अत्यंत कौतुकास्पद आहे, असेही त्यांनी पत्रात नमूद केले आहे.

बुडन तांबोळी यांच्या या उपोषणाला यापूर्वीच रिपब्लिकन पक्ष आठवले गट, वंचित बहुजन आघाडी, लहुजी शक्ती सेना यांसारख्या संघटनांनी तसेच विविध पक्षातील नेतेमंडळी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी पाठिंबा दिला आहे. इस्माईल आळंद यांनीही आपण या लढ्यात तांबोळींसोबत असून त्यांच्या मागणीला पूर्ण पाठिंबा देत असल्याचे स्पष्ट केले आहे.

आळंद यांनी तांबोळींच्या उपोषणाला यश मिळो आणि त्यांच्या मागण्या लवकरच पूर्ण व्हाव्यात अशी आशा व्यक्त केली आहे. त्यांच्या या पाठिंब्यामुळे बुडन तांबोळी यांच्या आंदोलनाला आणखी बळ मिळाल्याचे बोलले जात आहे.या प्रसंगी माजी नगरसेवक सद्दाम शेरीकर,रईस टीनवाला,हुसेन बळूर्गी,मुकीद्द पिरजादे,इरफान दावणा,सैन शेख,वतीने कुरेशी,मुजममिल पिरजादे,अलिबादशाह अतार,सलिम गवंडी,लालू शेखव मौजूद वस्ताद सह इतर उपस्थित होते.

## प्रवाशांकडून जाणून घेतल्या समस्या ...तर वाहक-चालकांवर होणार कारवाई

# परिवहनमंत्र्यांची महामार्गावरील हॉटेल थांब्यांना अचानक भेट




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
भिगवण : परिवहन मंत्री व एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक पंढरपूर दौऱ्यावर असताना पुणे -सोलापूर महामार्गावरील एसटीच्या अधिकृत हॉटेल थांब्यांना अचानक भेट दिली. तेथील प्रवासी व एसटी कर्मचाऱ्यांशी संवाद साधला त्यांना मिळणारे अन्नपदार्थ ताजे आहेत का, अन्नपदार्थ वाजवी दरात मिळतात का, तसेच महामंडळाची नाश्ता योजना चालू आहे का याची चौकशी केली. याबरोबरच तेथील प्रसाधनगृहाची देखील त्यांनी आवर्जून पाहणी केली. यावेळी महिला प्रवाशांनी प्रसाधनगृहाच्या अस्वच्छतेबाबत तक्रार नोंदवली. त्याची तातडीने दखल घेत मंत्री सरनाईक यांनी सदर प्रसाधनगृहे तातडीने दुरुस्त करण्याचे निर्देश संबंधित हॉटेल मालकाला दिले. तसेच आढळलेल्या इतर त्रुटी बाबत संबंधित मालकाला विहीत वेळेत त्या दूर करण्याचे निर्देश दिले. अन्यथा सदर हॉटेल थांबा नाईलाजाने रद्द करण्याचे निर्देश देऊ, असे सांगितले. दरम्यान हे हॉटेल थांबे ज्या पुणे विभागात येतात त्या विभाग नियंत्रक यांना संपर्क साधून या हॉटेल थांब्यांच्या त्रुटीची पूर्तता पुढील एक महिन्यात करण्याचे निर्देश दिले.

अनाधिकृत हॉटेल थांब्यावर एसटी बस थांबवणाऱ्या चालक- वाहकांवर कारवाई

दरम्यान भिगवन जवळील एका अनधिकृत हॉटेल थांब्यावर एसटी च्या अनेक बसेस थांबलेल्या परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या निर्दशनास आले. त्यांनी तेथे भेट देऊन पाहणी केले असता, अत्यंत अस्वच्छ वातावरणात प्रवाशांना जेवण वाढले जात असल्याचे त्यांना दिसून आले. याबाबत त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त करून संबंधितांवर कडक कारवाई करावी. असे एसटीच्या अधिकाऱ्यांना निर्देश दिले.

### भिगवणला लवकरच नवे बसस्थानक होणार

परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक हे पंढरपूर दौऱ्यावर असताना महामार्गावरील भिगवन बसस्थानकाला त्यांनी भेट दिली. तेथील असुविधा बाबत स्थानिक रहिवाशांनी मंत्री सरनाईक यांच्या कडे कैफियत मांडली. महामार्गामुळे सदर बसस्थानक सखल भागात गेल्याने पावसाळ्यात पाणी साचून अत्यंत गैरसोय होते. तसेच येथील सध्या वापरात असलेले प्रसाधनगृहे देखील अत्यंत तकलादू व अस्वच्छ असतात, अशा तक्रार स्थानिक रहिवाशांनी केली. याबाबत महामंडळाच्या बांधकाम विभागाचे महाव्यवस्थापक दिनेश महाजन यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधून नव्या प्रशस्त भिगवन बसस्थानकाची निविदा लवकरात लवकर प्रसिद्ध करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या. त्यामुळे भिगवन येथे नवे बस स्थानक लवकरच आकाराला येईल असा आशावाद येथील रहिवाशांच्या मध्ये निर्माण झाला आहे.

– अभिजीत भोसले
जनसंपर्क अधिकारी
मा. मंत्री परिवहन

# सलगर येथे गुरुवारपासून यात्रा प्रारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
अक्कलकोट : तालुक्यातील सलगर येथे सालाबादाप्रमाणे यंदाच्या वर्षीही श्री शिव बसवेश्वर विरक्त मठाचे मठाधिपती परमपूज्य श्री. निंगय्या देवरु महास्वामीजी यांच्या दिव्य सानिध्यात श्री जय हनुमान कारुणी यात्रा- महोत्सव निमित्त विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.


यानिमित्त गुरुवार ( दि. १२ ) व्हन्नुगी, पहाटे जय हनुमान मुर्तीस महारुद्राभिषेक, सकाळी कळसारोहण, दुपारी पालखी उत्सव, नंदीध्वज, कुंभ व मिणीदोरसहीत पालखी व रथोत्सव कार्यक्रम सायंकाळी ७ वाजेपर्यंत भव्य सवाद्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. यावेळी शोभेचे दारुकाम व रथोत्सव कार्यक्रम संपन्न होईल.

त्यानंतर रात्रौ १० वाजता- श्री जय हनुमान पारिजात भजनी मंडळ व श्री महादेव भजना मंडळ,सलगर यांचा भजन कार्यक्रम होणार आहे.

शुक्रवार (दि.१३) कारुणी यात्रा महोत्सव पहाटे ३ ते सकाळी ७ पर्यंत दंडवत व सकाळी ७ ते दुपारी १२ पर्यंत बैलांचे मिरवणूक, मंदिर परिसरात दुपारी १२ ते सायंकाळी ६ :०० पर्यंत कारुणी बैल गाड्यांचे पळविण्याचा भव्य कार्यक्रम होणार आहे.

शनिवार (दि. १४) रोजी दिवसभर कलगीतुरा गाणे लाडकी, डप्पीन पदा भजन मंडळ विद्याश्री मशीबनाळ - विजयपूर श्री. मौलासाहेब मकानदार यांचे सुंदर भजन कार्यक्रम होणार आहे.

परगावहून आलेल्या भक्तगणांना पिण्याच्या पाण्याची व महाप्रसादाची सोय केलेली आहे. तरी सर्व सदभक्तांनी यात्रेत सहभागी होण्याचे आवाहन श्री जय हनुमान कारुणी यात्रा पंचकमिटीने केले आहे.



### सलगर येथे जय हनुमान कारुणी दोन दिवशीय यात्रा महोत्सव

तालुक्यातील सलगर येथे श्री जय हनुमान कारहुणवी यात्रेला अनन्य साधारण महत्त्व आहे.यामध्ये महाराष्ट्रसह कर्नाटकातील हजारो भाविक सहभागी होतात. हा नेत्रदीपक उत्सव सोहळा पाहण्यासाठी आबालवृद्ध - लहान मुलांसह नागरिक व महिला वर्ग मोठी गर्दी करतात. विशेषतः उत्सवात सर्व जाती धर्मातील भाविक सहभागी होऊन भारतीय संस्कृतीचे दर्शन घडवितात.
– सुनिल पाटील (सामाजिक कार्यकर्ता सलगर)

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# आषाढी यात्रेसाठी राज्य परिवहन महामंडळाकडून ५ हजार २०० विशेष बसेस सोडणार : परिवहनमंत्री प्रताप सरनाईक

## ग्रुप बुकींग असल्यास राज्याच्या कोणत्याही गावातून थेट पंढरपूरपर्यंत बस मिळणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी :आषाढी यात्रेच्या सोहळ्यानिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी च्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक पंढरपुरात येत असतात. राज्याच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या भाविकांचा प्रवास सुरक्षित व सुखकर व्हावा यासाठी राज्य परिवहन महामंडळाकडून यात्राकाळात ५ हजार २०० विशेष बस सोडण्याचे नियोजन केले असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

आषाढी यात्रा नियोजनासाठी चंद्रभागा बस स्थानक,पंढरपूर येथे एस टी महामंडळाच्या अधिकाऱ्यांच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ माधव कुसेकर व एसटीचे सर्व खाते प्रमुख उपस्थित होते.

यावेळी परिवहन मंत्री प्रतापसरनाईक म्हणाले, यंदा राज्यातील कोणत्याही गावातून ४० अथवा त्या पेक्षा जास्त भाविक प्रवाशांनी एकत्रित मागणी केल्यास त्यांना थेट पंढरपूरला जाण्यासाठी त्यांच्या गावातून एसटी बस उपलब्ध करून देण्यात येणार आहे. आषाढी एकादशीला राज्यभरातून लाखो भाविक-प्रवाशी पंढरपुरात येतात. अनेक प्रवाशी स्वत:च्या खाजगी वाहनाने, रेल्वेने, एसटीने अथवा विविध पालखींबरोबर चालत दिंडीने येतात या प्रवाशांना एसटीने यंदापासून थेट गाव ते पंढरपूर अशी बस सेवा उपलब्ध करून दिली आहे. या प्रवासात देखील ७५ वर्षावरील ज्येष्ठांना मोफत प्रवास देणारी अमृत ज्येष्ठ नागरिक योजना, महिलांसाठी ५० टक्के तिकीट दरात सुट देणारी महिला सन्मान योजना यासारख्या शासनाने दिलेल्या सर्व सवलती लागू राहणार आहेत.




तसेच आषाढी यात्रा काळात लांबच्या पल्याहून एसटी बसेस येत असतात. त्या बस चालकांना व वाहकांना राहण्याची चांगली व्यवस्था करावी त्याचबरोबर त्यांना आंघोळीसाठी गरम पाणी उपलब्ध करून द्यावे. बस स्थानकातून बस प्रवाशांना घेऊन जाण्याअगोदर बसची देखभाल दुरुस्ती करावी. एसटी बसच्या तात्काळ दुरुस्तीसाठी ज्यादा तांत्रिक कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी अशा सूचनाही परिवहन मंत्री सरनाईक यांनी केल्या.

भाविक-प्रवाशांनी, एसटीच्या सुरक्षित प्रवासी सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी यावेळी केले.

तसेच यात्रा काळात पंढरपूर येथे येणाऱ्या सर्व एसटी अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या चहा - नाश्ता व जेवणाची मोफत सोय करण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष श्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

गतवर्षी वर्षी एसटीने आषाढी यात्रेनिमित्त ५००० विशेष बसेस सोडल्या होत्या. याव्दारे यात्राकाळामध्ये सुमारे २१ लाख, भाविक - प्रवाशांची सुखरूप ने-आन एसटीने केली होती अशी माहिती राज्य परिवहन महामंडळाचे अधिकाऱ्यांनी यावेळी दिली.

**विना तिकीट प्रवास करणाऱ्या प्रवाशांना लगाम**

यात्रा काळामध्ये गर्दीचा फायदा घेऊन तिकीट न काढणे, वाहकाकडून तिकीट मागून न घेणे अशाप्रकारे फुकट प्रवास करू इच्छिणाऱ्या प्रवाशांना लगाम घालण्यासाठी एसटीने पंढरपूरला जाणाऱ्या विविध मार्गावर १२ ठिकाणी तपासणी नाके उभारण्याचे नियोजन केले आहे अशा फुकटया प्रवाशांना अटकाव करण्यासाठी एसटीचे २०० सुरक्षा कर्मचारी व अधिकारी यात्रा काळात २४ तास नजर ठेवूनअसणार आहेत.

### चार तात्पूरती बस स्थानके उभारणार

**पंढरपूर यात्रेसाठी राज्यभरातील लाखो भाविकांसाठी विविध विभागांतून गाड्या सोडण्यात येणार आहेत. वारकरी, भाविक तसेच पर्यटकांची होणारी गर्दी पाहता एकाच स्थानकावर गर्दी होऊ नये यासाठी प्रवाशांच्या सोयीसाठीयात्रा कालावधीत पंढरपूर येथे चंद्रभागा, भिमा, पांडुरंग (आयटीआय कॉलेज) व विठ्ठल कारखाना यात्रा स्थानक अशी चार तात्पुरती बस स्थानके उभारण्यात येणार आहेत. दरम्यान, यात्रा काळात बसस्थानकावर पिण्याचे पाणी, सुलभ शौचालय, संगणकीय आरक्षण केंद्र, चौकशी कक्ष, मार्गदर्शन फलक आदी सोयी-सुविधा पुरविण्यात येणार आहेत.**

**वाहतूकीच्या नियोजनासाठी एसटीची मदत**

एकादशीच्या दिवशी लाखो भाविक प्रवासी आपल्या गावाकडे मार्गस्थ होतात अशा वेळी रस्त्यावर वाहतूक कोंडी होऊन प्रवासाचा खोळंबा होतो यंदा स्थानिक पोलीस प्रशासनाच्या मदतीने ३६ पेक्षा जास्त वाहतूक नियंत्रक व सुरक्षा रक्षक वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी काम करणार आहेत. त्यामुळे रस्त्यावरील वाहतूक सुरळीत होण्यासाठी पोलीस प्रशासनाला एसटीची मदत होणार आहे.

**जिल्हानिहाय सोडण्यात येणाऱ्या बसेस**

* चंद्रभागा बसस्थानक येथून मुंबई, ठाणे, रायगड, सातारा, पुणे विभाग वपंढरपूर आगार
* भिमा यात्रा देगाव छत्रपती संभाजी नगर , नागपूर व अमरावती प्रदेश
* विठ्ठल कारखाना नाशिक, जळगाव, धुळे, अहमदनगर
* पांडुरंग बसस्थानक सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी व सिंधुदुर्ग

---

# पंढरपूर तालुक्यात अवकाळी पावसामुळे ९३.३७ हेक्टर पिकाचे नुकसान : तहसीलदार सचिन लंगोटे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर तालुक्यात १३ ते२१ मे दरम्यान झालेल्या अवकाळी पावसामुळे १५४ शेतकऱ्याचे नजर अंदाज ९३.३७ हेक्टर पिकाची नुकसान झाले आहे यामध्ये आंबा, केळी, डाळिंब, कांदा, शेवगा आदी पिकाची समावेश आहे. तसेच एकलासपूर येथे तीन घरांची पडझड झाली असल्याची माहिती तहसीलदार सचिन लंगोटे यांनी दिली.

तालुक्यात दिनांक १३ १५ व १९ मे २०२५ रोजी झालेल्या अवकाळी पावसामुळे तालुक्यातील आढीव, रोपळे, शेटफळ, खेड भाळवणी, गादेगाव, शिरगाव ,कोर्टी, बोहाळी, आदि गावातील १५४ शेतकऱ्यांचे ९३.३७ हेक्टर वरील पिकाचे नुकसान झाले आहे तसेच अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यामुळे एकलासपूर येथील तीन घरांची पडझड होऊन नुकसान झाले असून शिरगाव येथे अंगावर झाड पडून एक गाय मयत झाली आहे याबाबतचे पंचनामे करण्याचे कामकाज सुरू असलेली माहिती तहसीलदार लंगोटे यांनी दिली.



तसेच दिनांक ३१ मे २०२५ पर्यंत अवकाळी पाऊस गारपीट वादळी वाऱ्यामुळे होणाऱ्या नुकसानी पंचनामे करून एक जून २०२५ कृषी सहाय्य व ग्रामसेवक व ग्राम महसूल अधिकारी यांना अहवाल सादर करण्याचे आदेश तसेच कार्यालयाकडून देण्यात आलेले आहेत आली असून तालुक्यात पावसाळी पावसामुळे झालेले नुकसानी बाबतच्या एकत्रित अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत शासनास सादर करण्यात येईल असेही तहसीलदार सचिन लंगोटे यांनी सांगितले.

# १४ वर्षाखालील बालकामगार आढळल्यास त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कार्यवाही

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका ; दिनांक १२ जून या जागतिक बालकामगार प्रथा विरोधी दिनाचे औचित्य साधून सहाय्यक कामगार आयुक्त यांचे कार्यालय, सोलापूर मार्फत बालकामगार प्रतिबंध करण्याच्या दृष्टिने जिल्हा कृती दलामार्फत सोलापूर जिह्यात कारखान्यांना भेटी देणे, बालकामगार प्रथाविरोधीसह्यांची मोहीम राबविणे, पोस्टर चिकटविणे, जनजागृती करणे यासाठी दलाची स्थापना करण्यात आली असून त्यांच्या मार्फत आस्थापनांची तपासणी करून बालकामगार आढळून आल्यास त्यांची मुक्तता करणे व बालकामगार अधिनियमांतर्गत कार्यवाही करणे तसेच मालक, चालक यांचेकडून आस्थापनेमध्ये १४ वर्षाखालील बालकामगार काम करीत नाहीत व भविष्यातही काम करणार नाहीत असे हमीपत्र संबंधितांकडून घेण्याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत.

कोणत्याही कारखाना, आस्थापना, हॉटेल, गॅरेज तसेच धोकादाय उद्योग यामध्ये बालकामगार ठेवणे कायद्याने गुन्हा असून अशा ठिकाणी बालकामगार आढळल्यास त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. कोणत्याही कारखाना, आस्थापना, हॉटेल, गॅरेज तसेच धोकादायक उद्योग यामध्ये बालकामगार ठेऊ नये, असे आवाहन सहायक आयुक्त सुधीर गायकवाड यांनी केले आहे.

# रोजगार हमी योजना मंत्री भारत भोगावले यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : दिनांक ११ राज्याची रोजगार हमी योजना, उत्पादन व खारभूमी विकास मंत्री भारत गोगावले यांनी आज श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने समितीचे सदस्य ह. भ. प. ज्ञानेश्वर देशमुख जळगावकर यांच्या हस्ते रोजगार हमी योजना मंत्री श्री गोगावले यांचा शाल व श्री विठ्ठल रुक्मिणीची मूर्ती देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी आमदार राजू खरे, माजी आमदार सिद्राम म्हेत्रे , शिवसेना सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख महेश नाना साठे, शिवसेना नेते साईनाथ अभंगराव यांच्यासह मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

---

# नाशिक जिल्ह्यात एक जिल्हा, एक नोंदणी उपक्रमाची अंमलबजावणी सुरु

**खरेदी-विक्री व अन्य व्यवहारात नागरिकांची वेळ व खर्चाची होणार बचत**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : महाराष्ट्र शासनाच्या नोंदणी व मुद्रांक विभागाने एक जिल्हा, एक नोंदणी या उपक्रमाची अंमलबजावणी १ मे २०२५ पासून राज्यभर सुरू केली आहे. या उपक्रमाचा उद्देश दस्त नोंदणी प्रक्रियेत पारदर्शकता, सुलभता आणि नागरिकांना सुविधा प्रदान करणे हा आहे. या उपक्रमाअंतर्गत, नागरिकांना नाशिक जिल्ह्यातील कोणत्याही दुय्यम निबंधक कार्यालयात दस्त नोंदणी करण्याची मुभा आहे. यामुळे दस्त नोंदणीसाठी आता विशिष्ट कार्यालयात जाण्याची गरज नाही, ज्यामुळे वेळ आणि खर्चाची बचत होते. याचा नागरिकांनी फायदा घ्यावा असे आवाहन निफाडच्या सह दुय्यम निबंधक दिपाली जगताप यांनी केले आहे.

### नाशिक जिल्ह्यातील दस्त नोंदणी कार्यालये-

**(१ )नाशिक-१ (२) नाशिक -२(३) नाशिक -३ (४) नाशिक-४ (५) नाशिक-५ (६) नाशिक-६ ( ७) नाशिक- ७ ( ८) निफाड -१ (९) निफाड-२ (१०) देवळा (११) बागलान - सटाणा( १२) इगतपुरी (१३) पेठ (१४) सुरगाणा (१५) सिन्नर-१ (१६) सिन्नर -२ (१७) दिंडोरी (१८) येवला (१९) नांदगाव (२०) मालेगाव-१ (२१)मालेगाव -२ (२२) मालेगाव-३ (२३) कळवण (२४) त्रंबकेश्वर (२५) लासलगाव (२६) चांदवड**

# मुंबई लोकल दुर्घटना संदर्भात मनसेचे नेते अविनाश जाधव यांनी रेल्वे प्रशासनाला धरले धारेवर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/बाळासाहेब अहिरे : मुंबई लोकल प्रवास करणाऱ्या प्रवास यांच्या लोकल दरवाजामध्ये उभे असणारे प्रवासी यांच्या कल्याण कडे जाणारे लोकल तसेच मुंबईकडे जाणाऱ्या लोकांच्या दरवाजा उभे असलेले प्रवासी यांचे बॅग एकमेकांना घासल्याने तेरा प्रवासी लोकलमधून पडल्याने त्यातील चार प्रवासी मृत्यू झाले आहेत या संदर्भात महाराष्ट्र निर्माण सेनेचे नेते अविनाश जाधव यांनी रेल्वे प्रशासन यांना धारेवर धरत अनेक प्रश्न विचारले असतात लोकल एसी चालू आहेत त्याचे तिकीट जास्त असल्याने सामान्य प्रवासी त्या लोकांमध्ये प्रवास करू शकत नाही एसी लोकल एकामागे एक असल्याने प्लॅटफॉर्मवर प्रवाशांची गर्दी वाढते स्टेशन प्लॅटफॉर्म वरती पेपर विक्रेते तसेच अनेक स्टॉल त्या ठिकाणी असल्याने प्रवाशांना प्लॅटफॉर्मवर प्रवासी यांना जागा कमी पडत असल्याने मोठे गर्दी वाढते आणि असे अनेक घटना घडत असतात या संदर्भात असे प्रश्न केले तर रेल्वे प्रशासन यांनी आम्ही कारवाई करू असे आश्वासन दिले.




---

**चार आरोपींना अटक, राज्य उत्पादन शुल्क सोलापूर विभागाची कामगिरी**

**चार चाकी वाहनासह ३२ लाखांचा मुद्देमाल जप्त**

# विदेशी अवैध मद्य वाहतुकीवर राज्य उत्पादन शुल्क सोलापूर विभागाची कारवाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापू (जिमाका) ;- राज्य उत्पादन शुल्क विभाग सोलापूर यांची विभागीय उपआयुक्त पुणे विभाग सागर धोमकर यांच्या निर्देशानुसार अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क श्रीमती भाग्यश्री जाधव, राज्य उत्पादन शुल्क एस.आर. पाटील, यांचे मार्गदर्शनाखाली निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक क्र.१ या कार्यालयाने दिनांक १० जून २०२५ रोजी मोहोळ तालुक्यातील मोजे सिकंदर टाकळी व कुरूल परिसरात अवैध गोवा राज्य निर्मित परंतु महाराष्ट्र राज्यात विक्रीस प्रतिबंधीत असलेल्या विदेशी मद्याचे वाहन क्र. एम.एच ०७ ए.एस-३५३४ या वाहनामध्ये विदेशी मद्याचे ६० बॉक्सेस व एम.एच ०७ ए जी ८८९८ या वाहनामध्ये विदेशी मद्याचे एकुण ८० बॉक्सेस व दोन चारचाकी वाहनास एकुण सदर कारवाईत चार आरोपींना अटक करण्यात आली असून पुढील तपास निरिक्षक आर.एम. चवरे व दुय्यम निरीक्षक एस.डी.कांबळे हे करीत आहेत.

तसेच दिनांक १ एप्रिल २०२५ व १० जून २०२५ या कालावधीत राज्य उत्पादन शुल्क विभाग सोलापूर यांची सोलापूर शहर व जिल्ह्यात केलेल्या अवैध हातभट्टी निर्मिती केंद्रावर, अवैध देशी-विदेशी मद्य विक्री व वाहतुकीवर केलेल्या धडक कारवाईत एकुण ५७० गुन्हे नोंद करण्यात आले असून ५७१ जणांवर कारवाई करण्यात आली आहे. सदर कारवाईत २ लाख १४ हजार ९२५ ली. रसायन, ९ हजार ७७५ लि. हातभट्टी दारू, १०५३.१९ ब लि.देशी मद्य, ५८४.३२ ब.ली. विदेशी मद्य, १०२.३२ ब.ली.बिअर, ३२७८ ली.ताडी तसेच ५३ वाहनास एकुण रुपये १ कोटी ६८ लाख ९९ हजार ५५० रुपयाचा प्रोव्हि.गुन्ह्यातील मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच गतवर्षीच्या सन २०२३-२४ च्या तुलनेत सन २०२४-२५ या वर्षात एकुण गुन्ह्यात २५ टक्के व एकुण मुद्देमालात ३५ टक्के वाढ झाली आहे.




तसेच या विभागाकडुन या कालावधीत अवैध मद्य विक्री करणाऱ्या व मद्य पिण्यास परवानगी देणाऱ्या सोलापूर शहर व जिल्हा परिसरातील हॉटेल लक्ष्मी सावजी, हॉटेल न्यु हरीयाणा धाबा, डि,के. कोल्ड्रिंक्स हाऊस, हॉटेल भवानी, हॉटेल अविराज चायनिज, हॉटेल टोणपे, बालाजी मटण भाजनालय, शेख कोल्ड्रिंक्स हाऊस, असे एकुण ३३ ढाब्यावर गुन्हे नोंदविण्यात आले असून ढाब्यावर कलम ६८ व ८४ अन्वये १३२ जनांवर कारवाई करण्यात आली असून मा. न्यायालयाने ढाबा मालक यांना रुपये २५ हजार व मद्यपी ग्राहक यांना सरासरी रुपये ५०० रूपये ते ३ हजार रुपेय असे मिळुन एकुण रुपये ५ लाख ५१ हजार इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. सदर कारवाई निरीक्षक आर.एम.चवरे, तसेच दुय्यम निरीक्षक एस.डी.कांबळे, सहायक दुय्यम निरीक्षक मुकेश चव्हाण, व जवान सर्व नंदकुमार वेळापूरे, अण्णा कर्चे, पवन उगले, स्वप्निल आरमाळ, योगेश गाडेकर, महिला जवान शिवानी मुढे वाहनचालक दिपक वाघमारे यांनी पार पाडली. अवैध मद्यविक्री, अवैध निर्मिती व वाहतूकी विरोधात कारवाई या पुढेही चालू राहणार असून अवैध मद्याबाबत माहिती असल्यास टोल फ्री १८००२३३९९९९ क्रमांक अथवा व्हॉटस प क्रमांक ८४२२००११३३ या कार्यालयास माहिती दिल्यास माहिती देणाऱ्याचे नाव गुप्त ठेवले जाईल असे राज्य पत्पादन शुल्क अधीक्षक भाग्यश्री जाधव यांनी सांगुन अवैध मद्याबाबतची माहिती कळविण्याचे आवाहन केले आहे.

## थोडक्यात...

### किरकोळ कारणावरून शिवीगाळ करत मारहाण

सोलापूर, (प्रतिनिधी) म घराबाहेर बसलेले असताना फिर्यादी प्रथमेश दत्तूसा बारड (वय-३४,रा.अरपात नगर) यांना गल्ली शेजारी राहणारा शुभम व त्याचे अनोळखी तीन मित्र यांनी मिळून फिर्यादी यांची आई व घराशेजारी राहणारे देवेंद्र तसेच त्यांची पत्नी यांना




सर्वांनी मिळून शिवीगाळ करत हाताने व लाथा बुक्क्यांनी तसेच विट घेऊन मारहाण करत जखमी केले आहे.याप्रकरणी प्रथमेश बारड यांनी एम आयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, त्यांच्या फिर्यादीवरून शुभम व त्याचे तीन अनोळखी मित्र यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.ही घटना ८ जून रोजी रात्री नऊ वाजता सुमारास फिर्यादी यांच्या राहत्या घरासमोर घडली. या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार डोके हे करीत आहे.

### हॅण्डल लॉक केलेली दुचाकी पळवली

सोलापूर, (प्रतिनिधी) म मुळे हॉस्पिटल आभार येथे हॅंडल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एम.एच.१३.डीजी.५०८९ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २ ते ३ जून दरम्यान घडली.याप्रकरणी शंकर खंडेराव इंगुलकर (वय-७५,रा.सर्व मंगल अपार्टमेंट,रेल्वे लाईन) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोराटाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार चव्हाण हे करीत आहे.

# जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण समिती (दिशा) ची बैठक खासदार प्रणिती शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न

## दिशा समितीकडून केंद्र शासनाच्या लोक कल्याणकारी योजनाची प्रभावी अंमलबजावणीच्या अनुषंगाने सविस्तर आढावा घेऊन मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : केंद शासनाच्या विविध योजनांचा सविस्तर आढावा जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण समितीच्या बैठकीत खासदार प्रणिती शिंदे यांनी सर्व संबंधित शासकीय विभाग प्रमुखांनी केंद्र शासनाच्या लोककल्याणकारी योजनापासून जिल्ह्यातील एकही पात्र लाभार्थी वंचित राहणार नाही या दृष्टीने प्रयत्न करावेत अशा सूचना दिल्या.




नियोजन भवन समितीच्या सभागृहात आयोजित जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण समिती (दिशा) च्या बैठकीस खासदार धैर्यशील मोहिते पाटील, खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर,आमदार सुभाष देशमुख, आमदार अभिजित पाटील, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मनपा आयुक्त सचिन ओंबासे, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा चे प्रकल्प संचालक सुधीर ठोंबरे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार यांच्या सह सर्व संबंधित शासकीय विभाग प्रमुख उपस्थित होते.

यावेळी खासदार धैर्यशील मोहिते पाटील, धाराशिव चे खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर, आमदार सुभाष देशमुख, आमदार अभिजित पाटील यांनी केंद्र शासनाच्या विविध योजनांची जिल्ह्यात प्रभावी अंमबजावणी होण्यासाठी विविध सूचना मांडल्या तसेच समस्याही मांडून त्या प्रशासनाने त्वरित सोडवण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करावी अशी मागणी केली.

प्रारंभी केंद्र शासनाच्या योजनांची अंमलबजावणी करणाऱ्या सर्व संबंधित शासकीय यंत्रणांनी आपापल्या विभागांतर्गत सुरू असलेल्या योजनांची माहिती व सद्यस्थिती बैठकीत सादर केली. दिशा समितीचे सदस्य सचिव तथा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी जिल्ह्यातील सर्व शासकीय यंत्रणांकडून केंद्र शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी करून शेवटच्या घटकापर्यंत योजनेचा लाभ पोहोचवण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा प्रयत्नशील असल्याचे सांगितले.

**केंद्रीय योजना आढावा –**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना,

दिन दयाळ अंत्योदय योजना / राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान, दिन दयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना, दिनदयाळ अंत्योदय योजना शहरी प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, राष्ट्रीय सामाजिक साहय कार्यक्रम, स्वच्छ भारत मिशन ग्रामीण (डइच-ऋ), राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (छठथउझ), केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान सोलापूर पाणीपुरवठा शहर, केंद्र शासन पुरस्कृत सोलापूर शहर भूयारी गटार योजना, अमृत ड्रेनेज, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना (PMKSY), एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम (IWMP), भूमी अभिलेखाचे संगणकीकरण (NRLMP), सोलापूर स्मार्ट सिटी, झ.च. स्व निधी, दिन दयाळ उपाध्याय ग्रामीण ज्योती योजना (DDU-GJY), प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण, प्रधानमंत्री आवास योजना शहरी, प्रधानमंत्री कृषी विमा योजना, राष्टीय आरोग्य अभियान ग्रामीण, राष्ट्रीय आरोग्य अभियान शहरी, सर्व शिक्षा अभियान ग्रामीण, सर्व शिक्षा अभियान शिक्षण मंडळ शहर, समग्र शिक्षा / माध्यान्ह भोजन योजन शिक्षण मंडळ शहर, एकात्मिक बाल विकास योजना ग्रामीण, प्रधानमंत्री उज्वला योजना, Digital India Public Internet ccess Programme- Providing Service Centre on each Gram-panchayat, पायाभूत विकास कार्यक्रम महामार्ग, टेलीकॉम, रेल्वे इ., सांसद आदर्श ग्राम योजना आणि रे नगर फेडरेशन तर्फे सोलापूर येथे प्रधानमंत्री आवास योजना शहरी, या प्रकारे खासदार प्रणिती शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील दिशा समितीने केंद्रीय योजनांचा सविस्तर आढावा घेऊन मार्गदर्शक सूचना दिल्या. त्याप्रमाणेच पुढील दिशा समितीच्या बैठकीस सर्व ५८ शासकीय यंत्रणा प्रमुखांनी उपस्थित राहणे अनिवार्य असल्याचेही त्यांनी सूचित केले.

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक सुधीर ठोंबरे यांनी दिशा समितीच्या आजच्या बैठकीच्या विषयाची माहिती दिली तसेच बैठकीच्या शेवटी सर्व उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.

## आमणे येथील पुलावर संरक्षित कठडा बसवण्याची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील महत्त्वाच्या असलेल्या पडघा कल्याण रस्त्यावरील एका पुलावर संरक्षित कठडा नसल्याने अपघाताचा धोका वाढला आहे.

पडघा कल्याण रस्त्यालगत असलेल्या तळवली, सापे, वाशेरे, सावद, बापंगाव येथे गोदामांची संख्येत वाढ झाल्याने व या ठिकाणी विवीध उद्योगधंदे वाढल्याने पडघा कल्याण रस्त्यावर खाजगी प्रवाशी चारचाकी, मालवाहतूक वाहने, दुचाकी, एसटी बसेस यांची रात्रंदिवस वर्दळ असते मात्र पडघा कल्याण रस्त्यावरील वाशेरे व आमणे गावाच्या मध्यभागी असलेल्या एका ओहळावरील असलेल्या पुलावर संरक्षित कठडा नसल्याने वाहने पुलाखाली पडुन अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तर संरक्षित कठडा नसल्याने वाहने पुलाखाली पडुन अ प घा ता च्या



घटना घडुन वाहनचालकांना जिव गमवावा लागल्याचे स्थानीक नागरीकांनी सांगितले. त्यामुळे या पुलावर संरक्षित लोखंडी कठडा बसवण्याची मागणी वाहनचालकांनी केली आहे.

## हणमंत फुलारींच्या बैलजोडीला प्रथम क्रमांक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दुधनी /प्रतिनिधी : सालाबाद प्रमाणे यंदाही वर्षी कारहुणी सण निमित्त अक्कलकोट तालुकातील दुधनी येथील शेतकरी श्री हणमंत शिवलिंगप्पा फुलारी यांच्या बैल जोडीने बैल पळविण्याच्या शर्यतीत प्रथम क्रमांक पटकाविला. या निमित्त श्री बसव प्रतिष्ठानच्यावतीने श्री हणमंत शिवलिंगप्पा फुलारी यांचे सत्कार करून त्यांच्या बैल जोडीस पितळेचे साखळी चैन बहुमान देण्यात आले. यावेळी श्री बसव प्रतिष्ठानचे आधार स्तंभ भीमाशंकर



अंदेनी, दौलप्पा हौद, शांतलिंग वागदरी, गुरुशांत वडेयार, बसवराज मिरकल, उस्मान पठाण यांच्यासह दुधनीतील समस्त ग्रामस्थ व श्री बसव प्रतिष्ठानचे सदस्य व गावातील शेतकरी वर्ग मोठ्या संख्याने उपस्थित होते.

**पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर**

**सामाजिक उपक्रम घेऊन गोरगरिबांना जेवण साहित्य वितरण करण्याचा संकल्प**

# महाराष्ट्र राज्य समाज कल्याण न्यासच्या प्रदेशाध्यक्षपदी मा.आ. रुपेश म्हात्रे तर प्रदेश उपाध्यक्षपदी राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वास आरोटे यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शिर्डी / प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य समाज कल्याण न्यास या संस्थेच्या प्रांतिक अध्यक्षपदी शिवसेना एकनाथ शिंदे गटाचे नेते तथा माजी आमदार रुपेश म्हात्रे यांची प्रदेशाध्यक्षपदी तर प्रदेश उपाध्यक्षपदी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गावकरीचे संपादक डॉक्टर विश्वास आरोटे यांची निवड करण्यात आली.




तसेच याचबरोबर महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी स्वप्निल भोईर,प्रदेश संपर्कप्रमुखयोगेश बेनके,प्रदेश प्रवक्ता संजीवन म्हात्रे, प्रदेश कार्याध्यक्ष नारायण मामा पाटील, प्रदेश कार्यकारिणी सदस्य डॉ.किशोर बळीराम पाटील,प्रदेश अध्यक्ष शिक्षक सेना सुधीर जावळे, उत्तर म. सचिव संजय फुलसुंदर, उत्तर म. प्रदेश संपर्कप्रमुखडॉ.मनिलाल रतिलाल शिंपी, प्रदेश कोकण विभाग अध्यक्ष शंकर खारीक,ठाणे जिल्हा अध्यक्ष ज्ञानेश्वर भोईर, ठाणे जिल्हा सचिव आणि ठाणे जिल्हा अध्यक्ष शिक्षक सेना विलास भोईर,पालघर जिल्हा अध्यक्ष प्रकाश देवळीकर, नाशिक जिल्हा अध्यक्ष मूलचंद भगत, बीड जिल्हा अध्यक्ष फारुख भाई शेख, धुळे जिल्हा अध्यक्ष समाधान पाटील ठाणे जिल्हा अध्यक्षा ( महिला आघाडी) नलिनी चौधरी, नाशिक जिल्हा कार्याध्यक्ष अजित गायधनी, महिला आघाडी समाज कल्याण न्यास जिल्हा अध्यक्ष सौ गायत्री महिंद्र पगार, ठाणे जिल्हा कार्याध्यक्ष राजेंद्र बळीराम काबाडी,ठाणे महिला आघाडी जिल्हा कार्याध्यक्ष ॲड शुभांगी ताई निचिते, भिवंडी शहर जिल्हाध्यक्ष सौ स्वाती कांबळे, पालघर जिल्हा अध्यक्ष प्रकाश देवळीकर, ठाणे जिल्हा महिला अध्यक्ष सौ नलिनीताई घरत, पालघर जिल्हा महिला आघाडी अध्यक्ष सौ अंजलीताई चौधरी आदींची राज्यातील जम्बो कार्यकारणी जाहीर करून पदाधिकाऱ्यांना नियुक्तीचे पत्र प्रदान करण्यात आले. नुकतीच शिर्डी येथे समाज कल्याण या संस्थेची २४ वार्षिक सर्वसाधारण सभा व पदाधिकारी मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी हास्य प्रबोधनकार तथा समाज कल्याण न्यास संस्थेचे प्रवक्ते संजीवन म्हात्रे होते. तर व्यासपीठावर समाज कल्याण न्यास या संस्थेचे संस्थापक तथा थोर धर्मसेवक डॉ. सोन्या पाटील यासह अनेक मान्यवर व्यासपीठावर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी अध्यक्ष स्थानावरून बोलताना हास्य प्रबोधनकार संजीवन म्हात्रे यांनी आपल्या भाषणात पदे घेऊन ते पदे लग्न पत्रिका व विविध कार्यक्रमांच्या नावासाठी वापर करू नका समाज कल्याण या संस्थेच्या माध्यमातून संपूर्ण हिंदुस्तानात सामाजिक कार्याचा वेलु गगनावर गेला आहे या संस्थेच्या माध्यमातून ३६५ दिवस समाजसेवा हीच ईश्वर सेवा मानून हा उपक्रम गेल्या २४ वर्षापासून सुरू आहे. दरवर्षी समाज कल्याण या संस्थेच्या माध्यमातून शैक्षणिक साहित्य दिपवाळीनिमित्त मिठाई, साडी तसेच आदिवासी भागामध्ये प्रत्येक वर्षी नवीन म्बुलन्स, आरोग्य शिबिर, खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी क्रीडा महोत्सव आयोजन केले जात असते. धर्मसेवक डॉ. सोन्या पाटील यांनी समाजसेवा हीच ईश्वर सेवा मानून आपल्या आयुष्यामध्ये सोन्यासारखी माणसे कमवली. आज स्पर्धेच्या युगामध्ये प्रत्येक जण पैशाच्या पाठीमागे पळतो पण हा माणूस माणसे कमवण्याच्या पाठीमागे पळतो मला काहीच नको जे व्यासपीठ आपल्यासाठी उपलब्ध करून दिले आहे. त्या व्यासपीठाच्या माध्यमातून समाजसेवा करत असताना आपण या संस्थेचे एक पाईक आहात या संस्थेच्या माध्यमातून आपली ओळख आपल्या समाज कल्याण या संस्थेची ओळख ही संस्था मातृसंस्था असून या संस्थेच्या माध्यमातून कोणालाही राजकारण करायचे नाही कोणतेही पदे मिळवायची नाही. राजकारणासाठी या संस्थेचा वापर आजपर्यंत आम्ही केला नाही. या संस्थेच्या कार्याचा आदर्श संपूर्ण हिंदुस्थानाला परिचित आहे. या संस्थेच्या पदाधिकाऱ्याला काम करण्याची संधी मिळते तो त्याच्या जीवनामध्ये आपण एक चांगल्या परमार्थामध्ये काम करत असल्याचा आनंद मिळत असतो सर्वांनी हा आपला एक परिवार आहे आपल्या परिवारामध्ये कोणावरही संकट ओढवले तर ते सर्वांनी एकत्रित येऊन त्याच्यावर मात करण्यासाठी या संस्थेची खरी निर्मिती केली आहे या संस्थेमध्ये आमदार खासदार नगरसेवक सरपंच या सर्वांना संधी दिली जाते त्यांनी देखील पदाच्या माध्यमातून नक्कीच सोने केले आहे ही संस्था प्रत्येकाला विचार पुढे नेणारी मातृसंस्था आहे गेल्या २४ वर्षांपासून भिवंडी ते शिर्डी पायी पालखी जात असते यामध्ये हजारो भक्तगण सामील होतात हा एक साईबाबांचा संदेश प्रत्येकाच्या मनामध्ये देण्यामध्ये या संस्थेचा मोठा वाटा राहिला आहे कोणत्याही प्रकारची देणगी न घेता स्वयंस्फूर्तीने धर्म सेवक डॉक्टर सोन्या पाटील यांनी जगाला एकत्र येऊन विचारांची देवाणघेवाण करणारी ही संस्था असून सबका मालिक एक है हा विचार प्रत्येकाने मनी रुजवला आहे २४ वर्षाच्या कार्यकाळामध्ये या संस्थेने सोन्यासारखी कोट्यावधी लोकांच्या मनामध्ये वेगळे स्थान निर्माण केले आहे या संस्थेच्या माध्यमातून माणसातील माणूसपण जागा करण्याचा खरा संकल्प दिला जात आहे तूज आहे रे तुझं पाशी तू जागा चुकलासी या उक्तीप्रमाणे नुकतीच शिर्डी येथे साई पालखी निवारा येथे या संस्थेचा २४ वा वर्धापन दिन व पदाधिकारी मेळावा व नवीन पदाधिकारी नियुक्ती सोहळा संपन्न झाला यावेळी भिवंडी विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार सुरेश म्हात्रे यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली त्यांच्या निवडीने नक्कीच नवचैतन्य प्राप्त झाली असून अनेक वर्षांपासून त्यांनी या संस्थेचे कामकाज पाहिले असून या संस्थेने दिपवाळी काळामध्ये प्रथम गोरगरिबाची दिवाळी मग आपली दिवाळी हा संकल्प गेल्या २४ वर्षापासून साकारला आहे यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस दैनिक समर्थ गावकरीचे संपादक डॉक्टर विश्वास आरोटे यांनी बोलताना सांगितले.

समाज कल्याण हे प्रत्येक कार्यकर्त्याला काम करणारी मातृसंस्था असून दुसऱ्याच्या तव्यावर आपली पोळी भाजून घेता प्रत्येकाने मिळालेल्या संधीचे सोने करावे आपले विभागांमध्ये सामाजिक कार्यातून या संस्थेची ओळख निर्माण करावी या संस्थेचा मुख्य हेतू शैक्षणिक साहित्य दिपवाळी निमित्ताने साहित्य म्बुलन्स शैक्षणिक साहित्य. वितरण केले जात आहे.

यावेळी अहवाल सालामध्ये मृत्यू पावलेल्या शहीद जवानांना आदरांजली वाहण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात साईबाबांची आरती होऊन दीप प्रज्वलन करून सुरुवात करण्यात आली होती राज्यभरातून हजारो पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते आभार प्रदर्शन या संस्थेचे प्रवर्तक जेके पाटील यांनी केले शेवटी स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

समाज कल्याण या संस्थेचे संस्थापक धर्म सेवक सोन्या पाटील यांच्या वाढदिवसानिमित्ताने हजारो कार्यकर्त्यांनी त्यांना पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला सत्काराला उत्तर देताना हार तुरे हे अनाटाई खर्चाला फाटा देऊन सर्वांनी एक पेन एक वही जरी विद्यार्थ्याला देऊन दरवर्षी वाढदिवस साजरा करण्यासाठी प्रत्येकाने माझ्याकडे येण्यापेक्षा आपल्या मतदारसंघांमध्ये सामाजिक उपक्रम घेऊन गोरगरिबांना जेवण साहित्य वितरण करण्याचा संकल्प यावेळी धर्म सेवक सोन्या पाटील यांनी व्यक्त केला. यावेळी दीपक पाटील, गजानन पाटील, साजन भगत, सौ. रजिता दुपारे, विनयाकदम, गायत्री पगार, शोभा थोरात, अश्विनी माने, सुनंदा निंबाळकर, कविता सरोदे, ज्योती गोडसे, सिंधूताई पगार, रत्न महाले, सहदेव जाधव, शिल्पा देहकर, सीमा निचित, रोहिणी फरडे, गायत्री फरडे, वनिता कुरकुटे यासह अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.